T-27

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र. झोपुप्रा/तां.१/प्र.क्रे./झोनिआ/ ३८७ /१६
दिनांक :- १६/०३/२०१६

# "झोपडपट्टी निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ ( प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे. ) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि. ३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. नाकोडा अल्का डेव्हलपर्स यांनी आर्किटेक्ट प्राईड डिझायनर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं.२५९३ ते २६०५ , २६०६, २६०७ ते २६११, बोपोडी, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदर अंतिम यादीच्या (परिशिष्ट-२) गोषवाऱ्याचे अवलोकन करता सदर मिळकतीवर एकुण ३७ झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी २२ व पात्र बिगर निवासी ४ असे एकुण २६ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी २६ झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास संमती दिलेली आहे. म्हणजेच १००% झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास संमती दिलेली आहे.

ज्याअर्थी, पुणे शहरातील झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रांसाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (क) अन्वये पुणे शहर (नवीन व जुनी मनपा हद्द) क्षेत्रातील उक्त अधिनियमाचे (i) कलम ४ अन्वये पुणे शहरातील सर्व घोषित झोपडपट्टी क्षेत्रे आणि (ii) सार्वजनिक मिळकतीवरील गणणाकृत झोपडपट्टी क्षेत्रे यांसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत जा.क्र.झोपुप्रा/कअतां/झोपुआ/२५७/२०१४ दि.१०/०२/२०१४ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या ३ (क) अन्वये आदेश एकत्रित पारित करणेत आले आहे. सदर आदेश स्थानिक वृत्तपत्रात दै. लोकमत व दै. सांजमहानगरी दि.१२/०२/२०१४ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे व दि.२० ते २६/०२/२०१४ रोजीच्या राजपत्रात पान.क्र.२६ वर प्रसिध्द करणेत आला आहे व दि.२०/०४/२०१५ रोजी सदर आदेश झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पध्दतीनें प्रसिध्द झाला असुन विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही वा विशेष न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल झालेले नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

त्याअर्थी, मी कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे उपरोक्त अधिनियमाचे कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणुन घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) आठवडयाच्या आत पाडून टाकून जमिन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजुर करुन प्रत्यक्ष बांधकाम सुरु केले पाहिजे.
२. विकसकाने योजनेचे काम चालु करणेपूर्वी विस्थापित होणा-या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यत्या त्या सर्व सुविधांसह स्व:खर्चाने केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दिलेल्य कालावधीत पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारुन मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.
८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ४ (चार) आठवडयांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं.२५९३ ते २६०५ , २६०६, २६०७ ते २६११, बोपोडी, पुणे | ११६१.७३ चौ.मी. | **पुर्वेस** - रस्ता |
| | | **पश्चिमेस** - सि.स.नं. २६२४ आणि ओपन स्पेस |
| | | **उत्तरेस** - लागु सि.स.नं. २६१२ |
| | | **दक्षिणेस** - लागु सि.स.नं. २५८६ |

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधीतांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

(कुणाल कुमार)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-



Scanned with CamScanner